**• आच्छादनाचे विविध प्रकार :-**




**१) सेंद्रिय आच्छादने :-** उदा. ज्वारीची धसकटे तुरकाड्या, वाळलेले गवत गव्हाचा भुसा व काड, उसाचे पाचट, कापशीचे काड, वाळलेली पोल यांचा यामध्ये समावेश होतो.

**२) असेंद्रिय आच्छादने :-**

चंदेरी, काळसर, पांढऱ्या अशा पारदर्शक पेपरच्या वापर केला जातो. मल्चिंग आच्छादन यामधे जमिनीच्या पृष्ठभागावर पिकांचे अवशेष जसे की पाने,पालापाचोळा, कांद्या, काडी कचरा इत्यादींचा वापर करून जमिन झाकली जाते. त्यामुळे जमिनीतील पाण्याचे बाष्पीभवन कमी प्रमाणात होईल तसेच जमिनीमध्ये अन्नद्रव्ये धरून ठेवण्यासाठी मदत होते. पिकांमध्ये आच्छादन केल्यामुळे जमिनीवर व जमिनीमध्ये सूक्ष्म वातावरण सुधारणेसाठी मदत होते. यामुळे जमिनीमध्ये गांडूळची संख्या वाढण्यास मदत होते. जमिनीमध्ये ह्युमस ला सुरक्षित ठेवण्यासाठी सहकार्य होते

**• आच्छादनाचे फायदे / महत्व :-**

१) जमिनीमध्ये पाणी धरून ठेवण्यासाठी उपयोग होतो.
२) जमिनीतील तापमान नियंत्रणासाठी मदत होते.
३) सेंद्रिय घटकांचे प्रमाण वाढविण्यासाठी मदत होते.
४) गांडूळांना अनुकूल वातावरण मिळण्यासाठी उपयोगी.
५) गांडूळांचे त्यांचा शत्रूपासून वाचविण्यासाठी मदत होते.
६) जमिनीचे भौतिक गुणधर्म सुधारण्यासाठी मदत होते.
७) पिकामधील तणांचे नियंत्रण करण्यासाठी उपयोग होतो.
८) जमिनीचा सेंद्रिय कर्ब वाढवण्यासाठी मदत होते.



**४) वाफसा :-**

पिकांच्या वाढीसाठी आणि योग्य उत्पादनासाठी पिकांच्या मुळांच्या कक्षेमध्ये आवश्यक तेवढे पाणी असणे महत्वाचे मानले जाते. पिकांना देण्यात येणारे पाणी हीं मुख्यत्वे करून वाफसा किंवा योग्य असा ओलावा आवश्क असतो. ज्यावेळेस जमिनिमध्ये ५० टक्के पाणी आणि ५० टक्के हवेचे प्रमाण असते त्या वेळेला आपण वाफसा स्थिती आहे असे म्हणत असतो. ज्यावेळेस मुळांच्या कक्षेमध्ये अति पाण्याचे प्रमाण आढळते तेव्हा पिकांना योग्य असे व्यवस्थापन न झाल्यामुळे पिके पिवळी पडतात किंवा ऑक्सिजन न मिळाल्यामुळे मरतात. यासाठीच पिकांना पाण्याचे महत्व फार असून जमिनीमध्ये जितकी जास्त वाफसा स्थिती असेल तेवढी पिंकाची योग पद्धतीने व्यवस्थापन

**५. मिश्र शेती पद्धती (जैव विविधता)**

या प्रकारच्या शेतीमध्ये सहभावना वृद्धींगत करून स्पर्धा कमी करण्याचा प्रयत्न केला जातो. एकमेकांना पुरक अशी पिकांची निवड करून पिके घेतली जातात. प्रत्येक पिक हे दुसऱ्या पिकांसाठी सहाय्यकाची भुमिका बजावतात. यामध्ये पिक फेरपालट, मिश्र पिके, एकत्रित पिकांची लागवड करून एकात्मिक पद्धतीने पिकांचे नियोजन करण्यात येते.

इं-२०२३-२४ प्रति ५०००

**• आंतरपिक पद्धती :-**

आंतरपिक पद्धतीमध्ये मुख्य पिकांची प्रति हेक्टरी रोपांची संख्या कमी न करता पेरणी अंतरात बदल करून जास्तीची आंतरपिके घेतली जातात. यामध्ये पिकांच्या वाढीच्या काळात परस्परांशी स्पर्धा न करता एकमेकांना पूरक ठरतील अशी पिके निवडली जातात. दोन्ही पिकांचा पक्वता कालावधी, वाढीचा प्रकार, मुळांची वाढ भिन्न प्रकारची असल्यामुळे पिकांच्या योग्य वाढीस जमिनीतील ओलाव्याची व अन्नद्रव्यांची गरज योग्य प्रकारे भागविली जा प्रकारे भागविली जाते. पावसामध्ये खंड पडल्यास कमीत कमी एक पिक तरी निश्चित येते.

उदा. बाजरी + तूर (२:१), सुर्यफुल + तूर (२:१), तूर + गवार (१:२) ,सोयाबिन + तूर (३:१)पद्धतीने घेता येतील.

**• पिकांची फेरपालट :-**

रब्बी हंगामात ज्वारी, हरभरा तसेच करडई या पिकांची फेरपालट केली तर उत्पादनात वाढ होते.

उदा. सोयाबीन - कांदा
सोयाबीन - गहू
हरभरा - करडई

✲ प्रशिक्षणादरम्यान शेतकऱ्यांना मार्गदर्शन ✲



✲ जिवामृत तयार करतांना ✲



✲ नैसर्गिक शेतीचे प्रात्याक्षित ✲




✲ लेखन व संकलन ✲

**श्री.उमेश पाटील**
विषय विशेषज्ञ (कृषिविद्या)
कृषि विज्ञान केंद्र,नंदुरबार

✲ प्रकाशक ✲

**श्री.राजेंद्र दहातोंडे**
वरिष्ठ शास्त्रज्ञ तथा प्रमुख
कृषि विज्ञान केंद्र,नंदुरबार



भाकृअनुप
ICAR

डॉ.हेडगेवार सेवा समिती

# कृषि विज्ञान केंद्र,नंदुरबार

मु.पो.कोळदा ता.जि.नंदुरबार-४२५४१२
www.kvknandurbar.net
Email.kvk_ndb@yahoo.com

नास्ति सेवासमो धर्म:


# आदर्श नैसर्गिक शेती पध्दती

**Out Scaling of Natural FarmingThrough KVKs**

